आवृत्ती दि. १४-०८-२००९

# तारुण्याचे आत्मभान





अस्वस्थ झालेली, भिरभिरत्या नजरेची अनेक तरुण मुले मला सदैव भेटत असतात.
त्यांना त्यांच्या 'जगण्याचा अर्थ' शोधायचा असतो. 'काहीतरी वेगळे करावे', 'चारचौघांपेक्षा निराळे जगावे' असे वाटत असते. अनेकांच्या मनात देशासाठी,
समाजासाठी काही करण्याची प्रामाणिक उर्मी असते. ही मुले मला विचारतात, 'आम्ही काय करू, ते सांगा.' - या प्रश्नाला एकच एक असे उत्तर नाही.
जे करावेसे वाटते त्याला धडाडून भिडणे आणि ते करून पाहणे; हाच त्यावरचा उपाय आहे. ते करून पाहिले की तुमचे तुम्हालाच कळेल की 'खरेच मला हे करायचे होते का? त्यासाठी आवश्यक क्षमता माझ्यात आहेत का? त्यासाठीची किंमत आपल्याला देता येते का? हाच माझा मार्ग आहे का?' - तुमच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा तोच मार्ग आहे.

'मला माझ्या देशासाठी काही करावेसे वाटते... काय करू सांगा?' - असे प्रश्न विचारत फिरू नका. या प्रश्नाचे उत्तर तुमच्यातच असते. ते शोधा.

आपण असे समजू , की आजच्या महाराष्ट्रात किमान एक कोटी तरुण-तरुणी आहेत. आणि त्यांच्याकडे त्यांचे अख्खे आयुष्य आहे. आपण असे मानून चालू की आयुष्याची किमान ५० वर्षे तरी अजून त्यांच्या हातात आहेत. त्या वर्षांत ते मनात येईल ते, जे जे शक्य आहे ते सारे करु शकतात. त्यासाठी त्यांच्याकडे आजच्या जगात अमाप संधी उपलब्ध आहेत. त्यातून स्वत:साठी ही मुले काय निवडणार हा प्रश्न आहे. काहीही निवडले तरी त्यासाठी त्यांना स्वत:च्या आयुष्याची उपलब्ध वर्षे मोजावीच लागतील. वेळ द्यावा लागेल आणि मोजावी लागेल किंमत जे कमवायचे त्यासाठी !
प्रश्न एवढाच आहे की या उपलब्ध एकाच आयुष्यात ही तरुण मुले-मुली करणार काय?
या प्रश्नाचे उत्तर वरवर वाटते तेवढे सोपे नाही. आपण नेमके काय करायचे हे तरुणांनाही चटकन ठरवता येण्यासारखे नाही. पण त्यांच्यासमोर करण्यासारख्या गोष्टी अनेक आहेत, शक्यता अनेक आहेत आणि त्यासाठीच्या संधीही उपलब्ध आहेत.
त्यातून काय निवडायचे असा प्रश्न असतो. या प्रश्नाच्या उत्तराचे पर्याय म्हणून आजची आर्थिक व्यवस्था त्यांना एक 'सौदा' देते.
त्या सौद्यात 'पैसा' हे एक मोठे आमीष आहे. रुढ व्यवस्था तरुण पिढीला पैसा देते आणि त्या बदल्यात त्यांच्याकडे आयुष्य मागते. विशेषत: १९९० नंतर आपल्याकडेही हे चित्र झपाट्याने बदलले. नोकरी-धंद्याच्या संधी वाढल्या. त्यातून मिळणारा पैसा वाढत गेला. 'सौदा' फायद्याचा आहे असे वाटावे इतपत पैसा अनेकांच्या हाती येऊ लागला आणि आपणही असेच केले तर... ? हा मोह इतरांनाही पडू लागला. या वाटेचे आकर्षण वाढले आणि एक चक्र सुरु झाले. अधिक चांगली नोकरी, अधिक पैसा, त्याहून

चांगली संधी आणि त्यापेक्षा जास्त पैसा. या चक्राने मिळणारा पैसा वाढला आणि हा सौदा असाच स्वीकारत रहाणाऱ्यांसाठी यापुढेही तो (कदाचित) वाढणारच आहे. पण एखाद्याने कमवायचाच असे ठरवले तरी तो नेमका किती पैसा कमावणार ? या जगात पैसा अमाप आहे, पण आपल्या हातात आयुष्य फक्त एकच. ते पुन्हा मिळणार नाही. त्या बहुमोल आयुष्याची किमत मोजून आपण फक्त पैसाच कमावणार का? पैसा महत्वाचा नाही असे नाही पण आयुष्याची किंमत मोजावी इतका महत्वाचा आहे का? आपले एकमेव आयुष्य त्या पैशासाठी देऊन टाकायचे का? तसे ते 'देऊन टाकणे' हा सौदा परव डणारा आहे का?-याचा विचार करायला हवा.

पण हा विचार करायची फुरसत मिळू नये इतके आकर्षक आणि वेगवान पर्याय तरुण-तरुणींपुढे ठेवले जातात. त्या 'सौद्या'पलिकडे दुसरे काही करुन पाहता येईल, आपल्याला नेमके काय हवे याचे उत्तर शोधता येईल अशा शक्यताच त्यांच्यासमोर कधी येत नाहीत. याउलट पैसा कमावणे आणि त्या बदल्यात आपले आयुष्य 'देऊन टाकणे' म्हणजे 'कमावणे' असा सरळ सौदा त्यांच्यापुढे असतो. म्हणून याच टप्यावर विचार करायला हवा की पैश्यासाठी आपण आपले आयुष्य विकून टाकू शकतो का? ते तसे 'विकायचे' नसेल, पैश्यासाठी आयुष्य द्यायचे नसेल तर मग कशासाठी द्यायचे?

ते सांगणारे, तशा शक्यता दाखवणारे आजच्या व्यवस्थेत काही नाही. म्हणून जो उपलब्ध आहे तोच सौदा स्वीकारुन तरुण पिढी स्वत:ला बांधून घेते. याचा अर्थ त्यांना तेच करायचे असते असे काही नाही.

मला सांगा, उद्या १५ ऑगस्ट आहे. स्वातंत्र्यदिन. यानिमित्ताने समजा आज कुणी विचारला तरुणांना प्रश्न की, तुमच्यापैकी किती जणांना आज रात्री जेवायला मिळेल की नाही याचीही शाश्वती नाही ? फार कमी लोक हात वर करतील. निदान दोन वेळा जेवायला मिळेल इतपत खात्री बहुसंख्यांना वाटावी, अशा टप्प्यावर आपण आलो आहोत. उपाशी रहावे लागण्याची असुरक्षितता आज बहुसंख्य तरुण मुला-मुलींच्या वाट्याला येत नाही. भुकेचे चटके सोसावे लागत नाहीत. निदान दोनवेळच्या जेवणाची सोय होईल इतपत सुबत्ता तरी काही एका वर्गात दिसतेय.

स्वातंत्र्य मिळाले आहे ते हेच. जीवनाच्या प्राथमिक गरजांसाठी ज्यांना संघर्ष करावा लागत नाही त्यांना प्राथमिक गरजांपासून स्वातंत्र्य मिळाले असे म्हणायला हवे. पण गरजांपासून स्वतंत्र होता होता आपण इच्छांचे गुलाम झालो. गरजा भागल्या म्हणता म्हणता इच्छांचे ढीग वाढू लागले. त्या इच्छांच्या पूर्ततेसाठी मग पैसा हवा आणि पैसा हवा तर 'सौदा' स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते. स्वतंत्र होता होता उपभोगाची नवी गुलामी आपण करायला लागलो. उपभोगाची व्यवस्था तरुणांसमोर अनेक लहानमोठे सौदे ठेवतानाच नव्या इच्छा कशा निर्माण होतील याचीही व्यवस्था करते.

मार्केटिंगचे तंत्र, जाहिरात प्रचार-प्रसार, दुरचित्रवाहिन्या आणि अवतीभोवतीची सारी माणसे आपल्याला उपभोगाच्या त्या गुलामीत लोटत राहतात. आणि आपण उपभोगाचे गुलाम होत जातो. एकीक डे प्राथमिक गरजांपासून स्वतंत्र होण्यासाठी संघर्ष करत असताना, त्यातून नुकतेच स्वातंत्र्य मिळाले असताना दुसरीकडे आपण उपभोग आणि इच्छांच्या गुलामीत जखडत चाललोय. उपभोगात निव ड स्वातंत्र्य आहे असे वाटते पण मुळात ती उपभोगाची गुलामीच.

आजच्या जगासमोर जे गंभीर प्रश्न उभे आहेत त्यांचेही मूळ या उपभोगातच आहे. उपभोगाच्याच हव्यासातून आज ग्लोबल वॉर्मिंग सारख्या समस्या उभ्या राहिल्या आहेत. त्यातून आपल्या अवतीभोवतीचे जग, हवामान, ऋतुमान बदलते आहे. या बदलांशी आजच्या तरुण पिढीच्या जगण्यामरण्याचा संबंध आहे. माझ्या पिढीने जे केले त्याचे परिणाम सोसायला आमची पिढी उद्या नसेल पण आजची तरुण पिढी किंवा त्यांच्या पुढच्या पिढीला या प्रश्नाचा सामना करावाच लागेल. जे झाले ते जर बदलता येणार नसेल तर अधिक हानी होऊ नये म्हणून आपण कोणती जीवनपद्धती स्वीकारणार ? की केवळ पैश्याचे सौदे करत स्वत:चे आणि पृथ्वीचे जगणे धोक्यात घालणार ? मोजणार किमत आपल्या आयुष्याची?

तूर्तास जगाची काळजी न करता आपण फक्त महाराष्ट्रापुरता विचार करु.
महाराष्ट्रात तरी काय वेगळे चित्र आहे ? इथे काही माणसांच्या प्राथमिक गरजा भागल्या आहेत, पण ते उपभोगाच्या गुलामीत अडकत आहेत. दुसरीकडे आजही काही माणसे त्याच प्राथमिक गरजांपासून स्वातंत्र्य मिळावे म्हणून संघर्ष करत आहेत. विदर्भात शेतकरी आत्महत्या करत आहेत, मेळघाट, ग डचिरोली या भागात कुपोषण, गरीबी, शिक्षण यासारखे विकासाचे प्रश्न आहेत. त्या प्रश्नांचे काय ? त्या माणसांचे काय? ते आपल्या समाजाचा भाग नाहीत ? त्यांना त्यांच्या प्राथमिक गरजांपासून स्वातंत्र्य मिळावे म्हणून आपण काही करु शकतो का ? त्यांना त्यांच्या दु:खापासून मुक्ती मिळावी म्हणून मदतीचा हात देऊ शकतो का ? की आपण आपल्याच समाजाकडे डोळेझाक करुन, आपल्याच समाजातल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन फक्त पैसा कमावणे याच एका सुत्राने सारे सौदे करणार? आणि मग म्हणणार की आयुष्यात काही गंमतच नाही?
असे वाटते तेव्हा तुम्ही तुमच्या आयुष्याचा सौदाच केलेला असतो.
'शोधग्राम'मधे आम्ही सर्वप्रथम 'निर्माण' ही संकल्पना आकारास आणली तेव्हा तरुण-तरुणींना त्यांच्या आयुष्याचे प्रयोजन शोधायला/ठरवायला मदत करणेहाच हेतू नजरेसमोर होता . महाराष्ट्रात तरुण मु लांना खूप काही करायचे आहे, त्यांच्या सामाजिक जाणिवा जाग्या आहेत. पण त्यांना नेमके काय करायचे हे कळत नाही. त्यांनी कुठल्या वाटेने जावे याचे तयार उत्तर माझ्याकडेही नव्हते. त्यांनी जर एखाद्या गोष्टीला त्यांचे आयुष्य द्यायचे ठरवले असेल तर त्यांनी ते स्वत: निवडावे. स्वत: त्यांच्या आयु ष्याचे प्रयोजन काय हे ठरवावे. म्हणून ही 'निर्माण'ची संकल्पना जन्माला आली.
२५-२६ वयोगटाची काही तरुण मुले आमच्यापर्यंत पोहोचली होती. त्यांचे शिक्षण नुकतेच आटोपले होते. समाजासाठी काहीतरी करायची त्यांची इच्छा होती. त्यांची संवेदना वाढवणे, आणि त्यांना स्वत:चा शोध घ्यायला मदत कशी करता येईल हे पाहणे या हेतूने 'निर्माण'चे काम सुरु केले. दोन वर्षातून एकदा ६० तरुणांची निवड करायचे ठरले. ज्यांना खरेच काहीतरी करण्याची इच्छा आहे, ज्यांचा कल या विषयाकडे आहे, आवड आहे त्यांची शिबीरांसाठी निवड करण्यात आली. त्या शिबीरांव्यतिरिक्तचा काळ ही मुले आपापल्या घरीच राहणार होती. आपापल्या भागातले प्रश्न त्याकाळात त्यांनी डोळसपणे पहावेत अनुभवावेत एवढीच अपेक्षा होती.
जी शिबीरे आम्ही घेतली त्यातही काही टप्पे केले होते. स्वत:चा शोध घेण्यापासून सुरु झालेला प्रवास या तरुणांना सामाजिक प्रश्न आणि आत्मभानापर्यंत घेऊन जाणार होता.
आम्ही सुरुवात केली ती एका साध्या प्रश्नापासून.
'मी युवा आहे? -म्हणजे मी काय आहे?'
अनेक तरुणांना हेच माहित नसते. तरुण वयात शरीरात वेगळ्या भावना निर्माण होतात. लैगिक भावना, प्रेमभावना जाग्या होतात. मुख्यत: शरीरात होणारा बदल पुरेसा जाणवायला लागलेला असतो. न कळणाऱ्या, गोंधळात पाडणाऱ्या या वयात स्वत:लाच समजून घेणे गरजेचे असते. मग सामाजिक जाणिवांचा विचार करता येतो.
जे स्वत:च्या तेच समाजाच्याही बाबतीत खरे आहे.
समाज समजून घेण्याचा. पाहण्याचा. अनुभवण्याचा हा टप्पा. तुम्ही कधी अनुभवलाय? आजुबाजूला जे प्रश्न आहेत ते पाहणे आणि ते अनुभवणे यात फरक असतो. आम्ही शिबिरातल्या तरुणांना आदिवासी गावात एखाद्या मजुराच्या घरी, त्याच्या कुटुंबासोबत ठेवले होते. आदिवासींच्या जगण्याचा अनुभव त्यांनी घ्यावा, नुस्ते पाहून नव्हे तर त्यांच्यासोबत जगून त्यांचे जगणे समजून घ्यावे, असा हा प्रयत्न होता.काही मुलांनी पहिल्यांदाच हे जग पाहिले होते. त्यातून त्यांना आलेले काही 'अनुभव' सकारात्मक होते तर काही नकारात्मकही. माणसांच्या जगण्याच्या व्यथा पाहून काही जण सून्न झाले. काहींना हतबल वाटले. तर ते प्रश्न सोडवण्यासाठी काय करायचे या विचाराने काहीजण अस्वस्थ झाले.
जगण्याचे प्रत्यक्ष धडे घेऊन आल्यावर ही मुले भीषण, त्रासदायक वास्तवाचे चटके खाऊन विषण्ण

होतात. मी एकटाच काय करणार? कधी सुटणार हे प्रश्न या विचारांनी त्यांना हतबल वाटू लागते. म्हणूनच तिसऱ्या टप्प्यात त्यांच्या भेटीगाठी होतात त्या विविध सामाजिक प्रश्न सोडवणाऱ्या अनेक व्यक्तींशी चर्चा या मुलांना करता येते. प्रश्न मोठे असतील पण ते सोडवता येतात, सोडवण्याचा निदान प्रयत्न करता येऊ शकतो असा विश्वास देणारे 'आदर्श'च त्यांना भेटवले जातात. प्रत्यक्ष काम करणाऱ्या लोकांचे अनुभव या तरुणांना अधिक सजग करतात.

हा सारा प्रवास झाला की प्रश्न पडतो की आम्ही 'युवा' म्हणून काय करायचे?

मग ही मुलं प्रश्न नाही विचारत तर परस्परांच्या मदतीने शोधतात की आपल्याला काय करता येईल ?

असेच एक उदाहरण. पुण्यातले. तिथल्या ग्रुपने पुण्यात कचरा कामगारांच्या समस्या समजावून घ्यायचे ठरवले. स्वतःहून. ते काही कुणी या मुलांना सुचवले नव्हते. ही मुले त्यांच्याबरोबर कचरा गोळा करत कचरा डेपोत गेली. त्यांच्याबरोबर कचऱ्याच्या ढिगाऱ्यात जेवली. त्या कामगारांच्या व्यथा त्यांनी अनु भवल्या. तो अनुभव घेतल्यावर त्यांच्या लक्षात आले की मध्यमवर्गीय शहरी जीवनशैलीच्या चुकांमुळे हा कचरा निर्माण होतो आहे. इतरांचा नाही पण निदान स्वतःचा कचरा कमी करण्याचा निर्णय या मुलांनी घेतला आणि लगेच अमलातही आणला.

मला वाटते प्रश्न पाहिले, त्यावरचे तोडगे काय हे अनुभवले तर त्या स्वयंशिक्षणातून तरुणांचे स्वतःचेच आयुष्य बदलते. त्यांना कुणी काही सांगायची गरजच उरत नाही.

असेच निर्णय या शिबीरातल्या काही मुलांनी स्वतःसाठी घेऊन टाकले.

मी गरजा कमी करीन.

मी कचरा कमी करीन.

मी सॉफ्टड्रींक पिणार नाही.

निदान मी वर्षातून दोन शर्ट खादीचे वापरीन.

हे कशाने झाले?

तर जग पाहून आल्यावर त्यांना काही गोष्टी आपोआप खुणावू लागतात. समाजासाठी आपण काय करावे या गोष्टींचे उत्तर ते स्वतः शोधू लागतात. काही जण आपल्या जीवननिष्ठा याच कामासाठी प्रगट करतात तर काही फक्त 'जागे' होऊन निघून जातात.

पण ज्यांना असे वाटते की आपण हेच काम करायचे आहे त्यांना आवडलेल्या कामाला, आवडलेल्या जागी वेळ देता यावा म्हणून वर्षभराची एक फेलोशिपही 'निर्माण' देते. या वर्षभरात हे तरुण त्यांच्या आवडीच्या विषयात केवळ कामच करत नाहीत तर ते तपासून पाहतात की हा माझा मार्ग आहे का? या कामासाठी आवश्यक क्षमता माझ्यात आहेत का? स्वतःचा आणि समाजाचा शोध ते या काळात घेतात.

मी एवढेच सांगेन की हा शोध तुमचा तुम्हालाही घेता येईल.

जे करावेसे वाटते ते करुन पाहणे हाच त्यावरचा उपाय आहे. ते करुन पाहिले की कळेल की खरेच आपल्याला हे करायचे होते का? त्यासाठी आवश्यक क्षमता आपल्यात आहेत का ? या कामासाठीची किंमत आपण देऊ शकतो का ? हाच आपला मार्ग आहे का?

या प्रश्नांची उत्तरे तुमची तुम्हाला सापडली की तुम्हाला तुमच्या आयुष्याचा 'सौदा' करावा लागणार नाही. तुम्ही तुमचा मार्ग स्वतः निवडाल. त्यात खरा आनंद असेल..आणि खरेखुरे स्वातंत्र्यही !

शब्दांकन- प्रतिनिधी

मागील पान पुढचे पान